अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय ,करीता शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या १ सेवानिवृत्त लेखा संवर्गातील अधिकारी, १ लघुलेखक व २ सहायक कक्ष अधिकारी (१ आस्थापना विषयक अनुभवी व १ योजना विषयक अनुभवी) अशा ४ सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने मानधन तत्वावर विवक्षित कामासाठी नामिकासूची करण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ क्र | संवर्ग | विवक्षित कामाचे स्वरूप | भरावयाचे पद संख्या | वय, अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | लेखा संवर्गातील अधिकारी ग्रेड पे ४३०० ते ४६०० | लेखा व रोखशाखा विषयक बाबी | १ | सहायक लेखा अधिकारी पदावरील कामकाजाचा किमान ३ वर्षांचा अनुभव .<br>१. रोखशाखा विषयक बाबी हाताळण्याचा अनुभव<br>२.महाराष्ट्र प्रशासकीय लेखा ,लेखा परिक्षण, वेतनपडताळणी इ. विषयांच्या संदर्भातील अनुभव<br>संगणकाचे ज्ञान, टंकलेखन तसेच प्रशासकीय बाबी व तांत्रिक कामकाजाचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य<br>वयोमर्यादा ५८ ते ६५ वर्षे |
| २ | लघुलेखक | स्वीय सहायक | १ | सेवानिवृत्त लघुलेखक<br>मंत्रालयीन सचिव / उपसचिव कार्यालयामध्ये कामकाजाचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य<br>वयोमर्यादा ५८ ते ६५ वर्षे |
| ३ | मंत्रालयीन संवर्गातील सहायक कक्ष अधिकारी | १. आस्थापना विषयक बाबी<br>२. योजना विषयक बाबी | २ | सहायक कक्ष अधिकारी पदावरील कामकाजाचा किमान ३ वर्षांचा अनुभव .<br>१. आस्थापना विषयक बाबी हाताळण्याचा अनुभव<br>२.योजना विषयक बाबी हाताळण्याचा अनुभव<br>संगणकाचे ज्ञान, टंकलेखन तसेच प्रशासकीय बाबी व तांत्रिक कामकाजाचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य<br>वयोमर्यादा ५८ ते ६५ वर्षे |

**नियुक्तीच्या अटी व शर्ती –**

१. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय, दि. १०.०६.२०२५ अन्वये नमूद अटी व शर्तींच्या आधारे नियुक्ती करण्यात येईल. सदर शासन निर्णयानुसार मासिक परिश्रमिक व भत्ते निश्चित करण्यात येतील.

२. करार पध्दतीने आयोगामध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तींना कोणतेही पदनाम असणार नाही व अर्जित, नैमित्तिक व वैद्यकीय रजा अनुज्ञेय असणार नाही.

३. नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीची असेल.

४. करारपध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय / वित्तीय अधिकार नसतील. अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र / आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही. इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज, शारीरीक व मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याचे प्रमाणपत्र, आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह ही **जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून दि ३०.०९.२०२५ पर्यंत सादर करावेत.**

**संपर्क** :- ५२८, मंत्रालय विस्तार इमारत, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
**ई-मेल** :- desk1.mdd-mh@gov.in

**अनुप कुडव**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**